महसूल व वन विभाग
## विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४
महाराष्ट्र शासन
महसूल शाखा
दूरध्वनी क्र.- (०२२) २७५७१५१७ ईमेल- rbkonkan@gmail.com

क्र.मशा/कार्या-८/टेनन्सी-२/कावि-वारस माहिती/२०२५ दिनांक:-२२/०८/२०२५

# परिपत्रक

**विषय:- मयत व्यक्ती/मयत खातेदार यांच्या वारसांची माहिती कळविणेबाबत निर्देश.**

गावातील मयत व्यक्तींच्या वारसांना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील विविध योजनांचे अनुज्ञेय असलेले लाभ देणे तसेच शेतजमिनीच्या अनुषंगाने अधिकार अभिलेखात मयत खातेदारांच्या वारसांची नोंद घेणे या करीता मयत व्यक्ती/खातेदार यांची माहिती संबंधित शासकीय यंत्रणांना प्राप्त होणेस विलंब होत असल्याने वारस नोंद होण्यास तसेच मयत व्यक्तींच्या वारसांना अनुज्ञेय लाभ मिळण्यास बराच अवधी जातो अथवा सदर योजनांचा लाभ वारसांना मिळतही नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर बाब विचारात घेऊन, मयत व्यक्ती/खातेदार यांची माहिती संबंधित शासकीय यंत्रणांना तात्काळ कळविणेच्या दृष्टीने, **गावातील एखादी व्यक्ती/खातेदार मयत झाल्यास त्याबाबतची माहिती संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पंचायत अधिकारी यांनी त्वरित ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांना द्यावी.**

ग्रामपंचायतीकडून मयत व्यक्तींची माहिती प्राप्त झालेनंतर संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांनी मयत व्यक्तींच्या वारसांना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील विविध योजनांचे अनुज्ञेय असलेले लाभ देणेकामी लाभास पात्र व्यक्ती/कुटूंबांची माहिती संकलित करून तहसिलदार कार्यालयास सादर करावी. सदर प्राप्त माहितीनुसार तहसिलदार यांनी दर १५ दिवसांनी आढावा घेऊन पात्र व्यक्ती/कुटुंबांना तात्काळ लाभ देणेची कार्यवाही करावी.

तसेच ग्रामपंचायतीकडून मयत खातेदारांची माहिती प्राप्त झालेनंतर संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांनी वारसांबाबत चौकशी करून मंडळ अधिकारी यांचेमार्फत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून वारस फेरफारावर निर्णय घ्यावा व विहीत मुदतीत अधिकार अभिलेखात वारस नोंद घेण्याची कार्यवाही करावी.

**( डॉ.विजय सूर्यवंशी )**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग**

प्रति,

१. जिल्हाधिकारी (सर्व) कोकण विभाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. (सर्व) कोकण विभाग
३. उपविभागीय अधिकारी (सर्व) कोकण विभाग
४. तहसीलदार (सर्व) कोकण विभाग
५. गट विकास अधिकारी, पं.स. (सर्व) कोकण विभाग